MHKO100013812016

**नियमीत दिवाणी दावा क्र. ६०/२०१६**

तुकाराम सांबरेकर वगैरे /वि/ संतू लांडे वगैरे.

## निशाणी क्र. ४३ वर आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा टंकलिखीत करीत असताना टंकलेखकाच्या अनावधानाने प्रतिवादी क्र.९ चे आडनांव 'बिरंजे' ऐवजी 'कदम' असे टंकलिखीत करणेत आले आहे. सदरची चुक ही अलिकडेच वादी यांना समजून आली आहे. त्यामुळे, वादी यांनी दाव्याच्या नावाच्या शिर्षकामधील प्रतिवादी क्र.९ चे नांवातील कदम या शब्दास पूर्णपणे काट मारणेत येऊन त्याऐवजी बिरंजे असा नवीन शब्द सामाविष्ट करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली. वर नमुद दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. वादी यांनी सुचविलेले दुरुस्तीमुळे दावेचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही. सदर दुरुस्तीस परवानगी न मिळालेस वादी यांचे कधीही व कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. याउलट, सदर दुरुस्तीस परवानगी मिळालेस प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, वादी यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी अर्जाचे मागील पानावर म्हणणे दिले व योग्य तो आदेश पारीत करणेबाबत विनंती केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, टंकलेखकाच्या अनावधानाने प्रतिवादी क्र.९ चे आडनांव 'बिरंजे' ऐवजी 'कदम' असे टंकलिखीत करणेत आले आहे, त्यामुळे प्रतिवादी क्र.९ चे आडनांवमध्ये कदम या शब्दास पूर्णपणे काट मारणेत येऊन त्याऐवजी बिरंजे अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तरी दाव्याचे स्वरुप पाहता वादींनी मागणी केलेप्रमाणे दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे, सदर दुरुस्ती केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याऊलट, दावा हा

गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, मुळ दाव्यात कोणतीही दुरुस्ती नसल्याने व केवळ नांवामध्ये दुरुस्ती असल्यामुळे मुळ दाव्यात कोणतेही बदल होत नसल्याने दाव्याचे स्वरुप बदलणारे नाही. तसेच, प्रस्तुतचा दावा हा प्राथमीक स्थितीत आहे. दाव्याची चौकशी अद्याप सुरु झालेली नाही, त्यामुळे आदेश ६, नियम १७ च्या निर्बंधाची बाधा प्रस्तावित दुरुस्तीस येत नाही. याशिवाय, केवळ दाव्यात दुरुस्ती केल्यामुळे सदर बाब सिध्द झाली असे होत नसुन वादीने मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती मधील कथन हे सबळ पुराव्यानिशी शाबीत करण्याची जबाबदारी ही वादींची आहे. सदरची दुरुस्ती दाव्याच्या प्राथमीक स्थितीमध्ये मागितलेली असल्यामुळे ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.04.17 18:01:37 +0530

**( एस. ए. राठोड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १७/०४/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 17/04/2023 |
| Order signed by P.O. on | 17/04/2023 |
| Order uploaded on | 17/04/2023 |